# प्रकरण दुसरे

## संशोधन साहित्याचे परिशीलन आणि

## संशोधन पद्धती

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

# प्रकरण - दुसरे
# संशोधन साहित्याचे परिशीलन आणि
# संशोधन पद्धती

## प्रस्तावना :

एखाद्या विषयावर संशोधन करत असताना त्या विषयाच्या संदर्भामध्ये उपलब्ध असणाऱ्या साहित्याचा संदर्भ घेणे सयुक्तिक ठरते. कारण संशोधन हे नेहमी उपलब्ध ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये नवीन भर टाकणारे असते. त्यामुळे संबंधित संशोधन विषयाच्या संदर्भात उपलब्ध असणाऱ्या साहित्याचे पुनरावलोकन केल्यास कोणत्या घटकांवर विशेष भर द्यायचा याविषयी एक साधारण कल्पना संशोधकाला येत असते.

## (I) विभाग पहिला

## २.१ संशोधन साहित्याचे परिशीलन: (Review of Literature)

प्रस्तुत संशोधन 'वडार समाजावर' असून हे प्रकरण दोन विभागात विभागले आहे. पहिल्या भागात उपलब्ध साहित्याच्या परिशीलनावरून आधीच्या संशोधनाच्या प्रमुख निष्कर्षाचा आढावा घेण्यात आला आहे. या अनुषंगाने संशोधकास उपलब्ध झालेल्या संबंधित विषयावरील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, इंटरनेटवरील लेख, संशोधनावर आधारित लिखाण, आत्मचरित्रपर लिखाण अशा स्त्रोतातून उपलब्ध झालेल्या साहित्याचे परिशीलन करण्यात आले आहे. दुसऱ्या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी ज्या संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यासंबंधीचे विवेचन केले आहे.

### आत्रे त्रि. ना. (१९१५):

यांनी 'गावगाडा' या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांच्या संदर्भात लिखाण केलेले दिसून येते. फिरस्ते या प्रकरणामध्ये वडार जमातीचा उल्लेख केलेला आढळून येतो. अत्रे यांनी या प्रकरणामध्ये सांगितले आहे की पालावरून जात ओळखता येते. तसेच



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रस्तुत पुस्तकामध्ये वडार लोकांच्या कामासंबंधी सांगितले आहे. वडार लोक बांधणी घालणे, विहिरी खोदणे, पाटे व वरवंटे बनविणे तसेच माल विकणे त्यांना टाके घालणे ही कामे स्त्रिया करतात. त्याचबरोबर वडार लोकांपैकी काही लोक भीक मागतात असे म्हटले आहे. उभे पीक व मेंढरे चोरणे, घरफोडी वगैरे गुन्हे करतात. वडारांच्या बिऱ्हाडाबरोबर गाढव, शेळ्या, बोकड, कोंबडी, कुत्री असतात. त्यांची डुक्करे गावोगात्र पिकांचा धुव्वा उडवतात असे म्हटले आहे. अशाप्रकारे गावगाडा या पुस्तकामध्ये वडार जमातीचा एक संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न अत्रे यांनी केलेला दिसून येतो.

**खरात शंकरराव : (१९८३)**

यांनी 'आज इथं उद्या तिथं' या पुस्तकामध्ये दगड मातीशी झगडा या प्रकरणामध्ये वडार समाजातील पूर्वीची परिस्थिती व वडार समाजाची बदलती परिस्थिती याचा उल्लेख केलेला आढळतो. पूर्वी वडार समाजामध्ये स्त्रिया चोळी घालत नसे त्यापाठीमागे दंतकथा दिसून येतात. परंतु सोलापूर येथील वडार समाजातील तरूणांनी १९३९ साली आपल्या समाजातील स्त्रियांनी चोळी घालावी, तसेच श्री.माने गुरूजी यांनी वडार समाजातील मुलींना शिक्षण द्यावं अशी चळवळीची भूमिका घेतली होती. असा उल्लेख आढळतो.

या पुस्तकामध्ये वडार जमात ही कष्टकरी व कामकरी जमात आहे असे सांगितले आहे. ही जमात भटकी असल्यामुळे पोटापाण्याच्या निमित्ताने त्यांच्या वस्त्या फिरत्या राहतात. विशेषत: लहान मोठ्या धरणाचे जेथे काम चालू असते अशा ठिकाणी त्यांच्या वस्त्या उभ्या राहिलेल्या असतात, असा उल्लेख आढळतो. तसेच आता काही शहरात व गावात वडार समाजाची वस्ती स्थायिक कायमची घरदारं करून राहिलेली आहेत. पण काही गावांत अशा स्थायिक झालेल्या वडार समाजाची परिस्थिती चरितार्थासाठी कामधंदा न मिळाल्याने गंभीर झालेली दिसते. आणि त्यामुळंच अशा परिस्थितीत स्थायिक झालेले पण कामासाठी पुन्हा काम मिळेल तिकडं कुटुंब घेऊन जातात व पुन्हा त्यांच्यावर भटकं जीवन जगण्याचा प्रसंग येतो. फार तर पावसाळ्यात आपल्या गावी येतात व पावसाळा संपल्यावर पुन्हा बाहेत पडतात. परंतु

# प्रकरण - दुसरे
# संशोधन साहित्याचे परिशीलन आणि संशोधन पद्धती

**प्रस्तावना :**

एखाद्या विषयावर संशोधन करत असताना त्या विषयाच्या संदर्भामध्ये उपलब्ध असणाऱ्या साहित्याचा संदर्भ घेणे सयुक्तिक ठरते. कारण संशोधन हे नेहमी उपलब्ध ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये नवीन भर टाकणारे असते. त्यामुळे संबंधित संशोधन विषयाच्या संदर्भात उपलब्ध असणाऱ्या साहित्याचे पुनरावलोकन केल्यास कोणत्या घटकांवर विशेष भर द्यायचा याविषयी एक साधारण कल्पना संशोधकाला येत असते.

## (I) विभाग पहिला

### २.१ संशोधन साहित्याचे परिशीलन: (Review of Literature)

प्रस्तुत संशोधन 'वडार समाजावर' असून हे प्रकरण दोन विभागात विभागले आहे. पहिल्या भागात उपलब्ध साहित्याच्या परिशीलनावरून आधीच्या संशोधनाच्या प्रमुख निष्कर्षाचा आढावा घेण्यात आला आहे. या अनुषंगाने संशोधकास उपलब्ध झालेल्या संबंधित विषयावरील पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध, इंटरनेटवरील लेख, संशोधनावर आधारित लिखाण, आत्मचरित्रपर लिखाण अशा स्त्रोतातून उपलब्ध झालेल्या साहित्याचे परिशीलन करण्यात आले आहे. दुसऱ्या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी ज्या संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यासंबंधीचे विवेचन केले आहे.

**आत्रे त्रि. ना. (१९१५):**

यांनी 'गावगाडा' या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांच्या संदर्भात लिखाण केलेले दिसून येते. फिरस्ते या प्रकरणामध्ये वडार जमातीचा उल्लेख केलेला आढळून येतो. अत्रे यांनी या प्रकरणामध्ये सांगितले आहे की पालावरून जात ओळखता येते. तसेच

प्रस्तुत पुस्तकामध्ये वडार लोकांच्या कामासंबंधी सांगितले आहे. वडार लोक बांधणी घालणे, विहिरी खोदणे, पाटे व वरवंटे बनविणे तसेच माल विकणे त्यांना टाके घालणे ही कामे स्त्रिया करतात. त्याचबरोबर वडार लोकांपैकी काही लोक भीक मागतात असे म्हटले आहे. उभे पीक व मेंढरे चोरणे, घरफोडी वगैरे गुन्हे करतात. वडारांच्या बिऱ्हाडाबरोबर गाढव, शेळ्या, बोकड, कोंबडी, कुत्री असतात. त्यांची डुक्करे गावोगाव पिकांचा धुव्वा उडवतात असे म्हटले आहे. अशाप्रकारे गावगाडा या पुस्तकामध्ये वडार जमातीचा एक संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न अत्रे यांनी केलेला दिसून येतो.

**खरात शंकरराव : (१९८३)**

यांनी 'आज इथं उद्या तिथं' या पुस्तकामध्ये दगड मातीशी झगडा या प्रकरणामध्ये वडार समाजातील पूर्वीची परिस्थिती व वडार समाजाची बदलती परिस्थिती याचा उल्लेख केलेला आढळतो. पूर्वी वडार समाजामध्ये स्त्रिया चोळी घालत नसे त्यापाठीमागे दंतकथा दिसून येतात. परंतु सोलापूर येथील वडार समाजातील तरूणांनी १९३९ साली आपल्या समाजातील स्त्रियांनी चोळी घालावी, तसेच श्री.माने गुरूजी यांनी वडार समाजातील मुलींना शिक्षण द्यावं अशी चळवळीची भूमिका घेतली होती. असा उल्लेख आढळतो.

या पुस्तकामध्ये वडार जमात ही कष्टकरी व कामकरी जमात आहे असे सांगितले आहे. ही जमात भटकी असल्यामुळे पोटापाण्याच्या निमित्ताने त्यांच्या वस्त्या फिरत्या राहतात. विशेषत: लहान मोठ्या धरणाचे जेथे काम चालू असते अशा ठिकाणी त्यांच्या वस्त्या उभ्या राहिलेल्या असतात, असा उल्लेख आढळतो. तसेच आता काही शहरात व गावात वडार समाजाची वस्ती स्थायिक कायमची घरदारं करून राहिलेली आहेत. पण काही गावांत अशा स्थायिक झालेल्या वडार समाजाची परिस्थिती चरितार्थासाठी कामधंदा न मिळाल्याने गंभीर झालेली दिसते. आणि त्यामुळंच अशा परिस्थितीत स्थायिक झालेले पण कामासाठी पुन्हा काम मिळेल तिकडं कुटुंब घेऊन जातात व पुन्हा त्यांच्यावर भटकं जीवन जगण्याचा प्रसंग येतो. फार तर पावसाळ्यात आपल्या गावी येतात व पावसाळा संपल्यावर पुन्हा बाहेत पडतात. परंतु

स्थायिक झालेल्या ज्या कुटुंबाची चांगली शेती आहे ती कुटुंब मात्र आपलं गावं घर-दार सोडत नाहीत. ते शेतीच्या व्यवसायावरच राहतात. अशी काही कुटुंब सांगली कोल्हापूराकडे आढळतात. याची नोंद केलेली आहे. तसेच शहराच्या ठिकाणी नवनवीन बिल्डिंगची कामे सतत निघतात. शहराच्या वाढत्या शहराच्या वाढत्या विस्तारामुळे वडार समाजाला कामधंदा मिळतो. म्हणूनच शहराच्या ठिकाणी वडार समाजाची वस्ती अधिक प्रमाणात वाढत आहे. असा उल्लेख आढळतो. या पुस्तकामध्ये वडार जमातीचा एक संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मांडे प्रभाकर (१९८३):**

यांच्या "गावगाड्याबाहेर" या पुस्तकामध्ये गावच्या बाहेर राहणाऱ्या जमातीचा एक सामाजिक-आर्थिक आढावा घेतलेला आहे. यातील प्रकरण बारामध्ये 'श्रमणारे वडार' या नावाने वडार समाजाविषयी माहिती दिल्याचे आढळते. या पुस्तकामध्ये मांडे यांनी सर्वात कष्ट करणारी जमात म्हणून वडार जमातीचा उल्लेख केलेला आढळतो. वडार लोक हे भिक्षा मागत हिंडत नाहीत तर कामाच्या शोधात ते गावोगाव फिरतात. वडार जमातीचे लोक भटके असले तरी सध्याच्या काळात ते स्थिरावलेले दिसतात. वडारांना निरनिराळ्या भागांमध्ये निरनिराळी नावे असल्याचं सांगितले जाते. उदा. महाराष्ट्रात वडार, ओरिसा मध्ये ओड्ड इ. वडार जमातीमधील प्रचलित असलेल्या दंतकथा याचाही उल्लेख आढळतो. वडारांच्या पोटजाती त्यांचे व्यवसाय, पोशाख, लग्नविधी, मर्तिकांचा विधी, जातपंचायतीचा प्रभाव, धार्मिक जीवन, व्यवसाय आणि गुन्हेगारी आणि वडारांच्या जीवनातील परिवर्तन यांचा देखील प्रमुख उल्लेख आढळतो.

**भट चंद्रशेखर (१९८४):**

यांनी आपल्या "Ethnicity and Mobility-Emerging Ethnic Identity and Social Mobility Among the Waddars of South India" या संशोधनावर आधारित पुस्तकामध्ये दक्षिण भारतातील वडार समाजामधील वांशिक ओळख व सामाजिक गतिशीलता याचा उल्लेख केलेला आढळतो.

प्रस्तुत पुस्तकामध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील मागासवर्गीय समाजातील सामाजिक गतिशीलता आणि बदलत्या स्वरूपाचे वर्गीकरण केलेले आहे. भटक्या विमुक्त जमातीच्या विकासावर होणाऱ्या परिणामांचा आणि त्यांच्यामधील बदलत्या दृष्टिकोणांचा अभ्यास केला आहे. ह्या सर्वांचा अभ्यास व्यष्टी अध्ययनातून (Case Study) वडार समाजाबाबत केलेला आहे. यामध्ये विशेषत: दक्षिण भारत, कर्नाटक इ. राज्यांचा अभ्यास केलेला आहे. १९४० च्या दरम्यान अर्ध भटकंती करणारे वडार जमात पूर्णपणे स्थिर जीवन जगताना दिसते, असा उल्लेख आढळतो. वडार समाजाच्या स्थिरीकरणामध्ये शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, समाजसुधारक इ. मुळे ते वेगवेगळ्या भागात स्थायिक झालेले आहेत. असे लेखकाने सांगितले आहे. मरटॉन च्या ग्रुप थेअरी चा वापर करून वडार समाजाचे रितीरिवाज व सुरक्षा या दोन गोष्टींवर वर्गीकरण केले आहे.

सदरचा अभ्यास हा कार्यक्षेत्रीय अभ्यासातून जानेवारी व जून (१९६८) डिसेंबर व मार्च (१९६९) आणि सप्टेंबर १९७० आणि मार्च १९७१ मध्ये करण्यात आला आहे. पहिल्या दोन कार्यक्षेत्रीय भेटीमध्ये 'मन्नु' या वडारांच्या उपजातीचा मोठ्या प्रमाणात अभ्यास करण्यात आला. तसेच शेवटच्या दोन कार्यक्षेत्रीय भेटीमध्ये मोठ्या प्रमाणावर वडारांमधील इतर उपजातीचा अभ्यास करण्यात आला. विशेषत: सिद्धापुरमधील 'उप्पु' व 'कल्लु' वडार व म्हैसुर जिल्ह्यातील हन्सुर तालुक्यातील 'मन्नु' वडार यांचा अभ्यास करण्यात आला. सिद्धापुर येथील वसाहत १९५० च्या दरम्यान वसली आहे, ही वसाहत निवडून भटक्या गटामधील बदलाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात अभ्यासण्यात आलेली आहे. तसेच आर्थिक बदलांचे सामाजिक गतिशीलतेवरील परिणाम अभ्यासण्यात आले सिद्धापुर मधील माहितीचे संकलन प्रथमत: सहभागी व असहभागी पद्धतीच्या निरीक्षणामधून दहा महिन्यामध्ये दोन भेटी दरम्यान करण्यात आले तसेच गृहभेटी दरम्यान माहितीचे संकलन माहिती देणाऱ्यांच्याकडून करण्यात आले. असा उल्लेख आढळतो. नेहमीप्रमाणे इतर कार्यक्षेत्रीय भेटी देणाऱ्यांना लोकांना समजावून सांगण्याची जी अडचण येते तशीच लेखकाला आली. काही अंशी भाषेची समस्या वडार समाजाची माहिती घेताना निर्माण झाली. नव्या पिढीला कन्नड भाषा येत असली तरी ते

घरी तेलगु भाषेचा वापर करतात. लेखकाने तीन महिने ही भाषा काही अंशी समजण्याकरिता घालवली. तसेच वेगवेगळी माहिती तहसीलदार कार्यालय, गटविकास अधिकारी, सेन्सस रिपोर्ट, जिल्हा गॅझेट यामधून घेतली. वडार समाजाचा तुलनात्मक अभ्यास करण्याकरिता वडार वसाहतीमधील 'उप्पु' वडार व 'कल्लु' वडार या उपजातींचा सखोल अभ्यास करण्यात आला. उप्पु वडारांची वसाहत बेल्लारी मधील वड्डारा बंदे येथे आहे. कल्लु व उप्पु वडारांच्या अभ्यास करण्यासाठी एकच कार्यक्षेत्रीय अभ्यास पद्धत वापरण्यात आली. वडार जमात ही वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेले असल्यामुळे वेगवेगळ्या विभागातून माहिती घेणे आवश्यक होते असा उल्लेख आढळतो. पुन्हा अभ्यासाकरिता परिचीत अशी मन्नु, उप्पु व कल्लु या वडारांच्या उपजाती निवडण्यात आल्या.

हा अभ्यास पाच भागामध्ये करण्यात आला आहे. पहिला भाग प्रास्ताविक, दुसऱ्या भागामध्ये वडारांची उत्पत्ती, व्यवसाय, उपजाती, अंतर्गत रचना व भटकी जीवन पद्धती तिसऱ्या भागांमध्ये मन्नु वडारांचा अभ्यास विशेष संदर्भासह भटके जीवन पद्धती, चौथ्या व पाचव्या प्रकरणामध्ये वडारांची सामाजिक गतिशीलता यांचा अभ्यास केला आहे. चौथ्या प्रकरणामध्ये वडारांचे रितीरिवाज, रूढी-परंपरा इ. चा अभ्यास, पाचव्या प्रकरणामध्ये वडारामधील शैक्षणिक, व्यावसायिक आणि राजकीय सहभाग याबद्दलचा अभ्यास केला आहे.

सहाव्या प्रकारणामध्ये अभ्यासाचा सारांश, वडारांच्या वांशिक, भटक्यापणाची सामाजिक गतिशीलता, रितीरिवाज, आर्थिक विकास याची नोंद घेतली आहे.

प्रस्तुत पुस्तकामध्ये भट्ट यांनी वडार समाज हा पूर्णपणे भटके जीवन किंवा स्थायी जीवन जगताना आढळत नाही, असे प्रतिपादन केले आहे. त्यामुळे त्यांना अर्धभटके वडार म्हणून ओळखले जाते. दगड खाणीमुळे बेल्लारीमध्ये कल्लु वडार मोठ्या प्रमाणात आढळतात. घर बांधकामासाठी स्वस्तात मिळणारा दगड हा आर्थिक, भौतिक, पर्यावरणीय प्रक्रियेमध्ये महत्त्वाचा भाग आहे. दुसऱ्या शब्दात त्यांचे राहण्याचा काळ व स्थलांतर तीन घटकांवर अवलंबून आहे. प्रथम दगड खाणीची उपलब्धता, दुसरे स्थानिक मागणी ज्यामुळे


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय स्थिती यावर दगड विटा व मातीचे बांधकाम अवलंबून आहे. तिसरे घटक कामगारांची उपलब्धता, जास्त कामगार जलद काम तसेच जलद स्थलांतर.

सिद्धापुरमधील उदाहरणामध्ये बाह्य घटक महत्त्वाचे भूमिका बजावतात असे सांगितले आहे. विकेंद्रीकरणामुळे वडार समाजामध्ये आर्थिक निधी शेतीमध्ये आल्याचे दिसून येते. परंपरागत चालिरीती-रिवाज विकेंद्रीकरण झाल्यामुळे आर्थिक बदल होत गेले. राजकीय सहभागामुळे वडारांमध्ये शैक्षणिक व रोजगाराच्या संधीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली, असा उल्लेख आढळतो. वडारांमध्ये सामाजिक गतिशीलता ही सामाजिक चळवळी संबंधित दिसून येते. सदस्य समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल घडवण्यास कारणीभूत आहेत. या पुस्तकामध्ये वडार जमातीविषयी अभ्यासपूर्ण चर्चा केलेली आहे व एक संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**कांबळे उत्तम (१९८८):**

यांनी आपल्या 'भटक्यांचे लग्न' या पुस्तकामध्ये भटक्या विमुक्त जमातीच्या लग्नविधीचे वर्णन केलेले आढळते. यामध्ये वडार जमातीविषयी लिहिताना ते म्हणतात, अंगमेहनतीची विशेषत: दगडाची कामे करण्यात वड्ड समाज तरबेज आहे. तसेच वडार जातीमधील चारही पोटजातींत बेटी व्यवहार होत नाही. प्रत्येकाची भाषा परस्परांपासून काही प्रमाणात वेगळी आहे. वडार जातीतील स्त्रिया अंगात चोळी घालत नाहीत. त्यापाठीमागे दंतकथा सांगितलेल्या आहेत. रावणाची सीतेची आणि आंध्रप्रदेशातील एका राजाची कथा सांगितली आहे. मुलगी पाहण्यासाठी मुलीकडील किमान पंधरा ते वीसजण असतात. नातेवाईकांबरोबर पंचाचाही त्यामध्ये समावेश असतो. हुंडापद्धती वडार समाजामध्ये प्रचलित असल्याचा उल्लेख आढळतो लग्नामधील विविध कार्यक्रमाचे वर्णन केलेले आढळून येते. उदा. लग्नाच्या आदल्या दिवशी नवरीच्या घरी हळदीचा खेळ असतो. पाचरात्री गाण्यांची, उखाण्यांची शर्यत लागते. इत्यादी अनेक कार्यक्रमांचा उल्लेख आढळतो.

**गर्गे स.मा. (१९८९):**

'भारतीय समाजविज्ञान कोशखंड-३' मध्ये भटक्या विमुक्त जमातीची व्याख्या व व्यवसायानुसार वर्गीकरण केलेले आढळते. त्यांच्या विवेचनानुसार "कोणत्या ही एके ठिकाणी स्थायी स्वरूपाची वस्ती न करता उपजिविकेसाठी सतत आणि वरचेवर स्थलांतर करणाऱ्या जमाती म्हणजे भटक्या जमाती" असा उल्लेख आढळून येतो. तसेच व्यवसायानुसार वर्गीकरण अन्न गोळा करणाऱ्या जमाती, प्राणी पाळणाऱ्या जमाती, छोटे व्यवसाय करणाऱ्या जमाती, भिक्षा मागणाऱ्या जमाती असे वर्गीकरण आढळते. गर्गे यांनी गावगाड्याला आवश्यक असणाऱ्या जमातीमध्ये त्यांनी घराच्या बांधकामासाठी वडार समाज सगळीकडे फिरत असतो, असा उल्लेख केला आहे. या कोशामध्ये महाराष्ट्र शासनाने सर्व जमातीची पाहणी करून भटक्या विमुक्त जमातींची वर्गवार यादी तयार केली आहे. त्यामध्ये वडार जमात ही विमुक्त जमातीत मोडते असा प्रामुख्याने उल्लेख आढळतो.

**चव्हाण रामनाथ (१९८९) :**

यांनी आपल्या 'जाती आणि जमाती' या पुस्तकामध्ये गावगाड्याचा भाग असलेल्या काही दलित वर्गातील जाती आणि या गावगाड्याच्या बाहेर शेकडो वर्षे असलेल्या भटक्या समाजातील काही जाती; त्याचप्रमाणे विमुक्त समाजातील काही जाती, पोटजाती यांचा अंतर्भाव केलेला आहे. समाजामधील भटक्या जमाती शेकडो वर्षे गुन्हेगार म्हणून ज्यांच्या माथी शिक्का मारला असा उपेक्षित समाज स्वातंत्र्याच्या ४२ वर्षानंतर विकासाच्या सर्व कार्यक्रमापासून बराचसा दूर राहिला आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हा समाज अजूनही असंघटित राहिला आहे. हा समाज संघटित झाल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटू शकत नाहीत. समाजामधील संघटित वर्ग आणि बहुतेक असंघटित वर्ग यांच्यामधील दरी झपाट्याने वाढत आहे. या असंघटित वर्गामध्ये भटक्या जमाती, विमुक्त समाज यांचा समावेश होतो. त्यामुळे या समाजाने अधिकाधिक संघटित होऊन आपला विकास करावा असा संदेश देण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला आहे.

## पिंगळे भिमराव (१९९०):

यांनी आपल्या 'वनवासी व उपेक्षित जग' या संशोधनावर आधारित पुस्तकामध्ये तीन विभाग केलेले आहेत. पहिला भाग डोंगरपाड्यातील वनवासी, दुसरा भाग शिवारवाड्यातील देशोदेशी व तिसऱ्या विभागामध्ये गावगाड्यातील वायंदेशी असे विभाग आढळून येतात. शिवारवाड्यातील देशोदेशी या विभागामध्ये वडार जमातीचा उल्लेख आढळून येतो. वडार समाजाच्या संदर्भात पिंगळे यांनी वडार जमात ही कष्टाळू व अंगमेहनत करून जगणारी जात आहे. ते लोक चोऱ्या-माऱ्या करताना दिसत नाहीत. डोंगराळ भागात ते सदोनित दगड फोडताना दिसतात. वडार धंद्याकरिता सडाकाची कामे व इतर बांधकामे असतील अशा भागात काम असेपर्यंत त्या भागात आपला मुक्काम ठोकतात. असा उल्लेख केलेला आढळतो.

वडार लोकांच्या व्यवसायासंबंधी देखील उल्लेख आढळतो. वडार लोक दगड फोडतात व माती-वडार मातीच्या भरावाची कामे करताना दिसतात. जाते-पाटे-वरवंटा, उखळ व इतर दगडाच्या वस्तू तयार करून ते गावोगावी विकतात. परंतु सध्या पिठाच्या गिरण्या झाल्यामुळे त्यांच्या जात्याचा धंदा जवळजवळ बंद झाला आहे. पिंगळे यांनी वडार समाजाच्या व्यवसायासंबंधी पुढे उल्लेख करतात. वडार जमात ही कष्टाळू आहे, पण सव्वा मणाच्या 'सुक्तीने' बारा महिने व अठरा काळ दगड फोडताना दिसतात. त्याचप्रमाणे त्यांच्या स्त्रियांसुद्धा सडकाची खडी व इमारतीस लागणारी खडी फोडतांना दिसतात. तसेच ते डोंगरातील दगड पहारीने काढतात व सुक्तीच्या सहाय्याने डबर, लाईनफूट इतर चिरे, शिळा, चिपा आदि आकाराचे दगड फोडतात इमारतीस लागणारा दगड, डबर, आदि सर्व प्रकाराचे दगड तेच काढतात. सडकास लागणारी खडी वडार स्त्रिया फोडीत असतात. परंतु अलीकडे खडी फोडण्याचे यंत्र आल्याने ते काम वडार लोकांना करावे लागत नाही. तरी पण त्या 'क्रशरना' लागणारा दगडाचा माल मात्र वडार आदि लोकच पुरवितात असा उल्लेख आढळतो.

प्रस्तुत पुस्तकामध्ये वडार हा महाराष्ट्र कर्नाटक आंध्र ह्या प्रांतात दिसतात असा

उल्लेख आढळतो. तसेच त्यांची भाषा तेलगू आहे. निरनिराळ्या भागात बेलदार वडार, वडार पाथरवट, मार्ती वडार, गाडी वडार आदि नावांनी ते ओळखले जातात. हे लोक मूळचे द्रविड असावेत. वडार हे क्षत्रिय असल्याने सगरपुत्र भगीरथ यांचे वंशज आपण असल्याचे मानतात. त्यांच्यात असणाऱ्या अनेक रूढी-परंपरा, कथा-दंतकथा सांगितलेल्या आहेत. वडारांच्या दगड फोडणे, चोळी न घालणे, काजळ न लावणे, डोक्यास तेल न लावणे, ह्या कारणांकरिता अनेक सुप्त कथा सांगितलेल्या दिसून येतात. वडार लोकांच्या सोबत गाढवे, कोंबड्या, कुत्री, शेळ्या आदि परिवार असतो. गाढव त्यांच्या व्यावसायिक कामात मदत करतात असा प्रामुख्याने उल्लेख आढळतो. माती उचलण्यास व तिची ने-आण करण्यास गाढवाची फार मदत होते. एका माणसापेक्षा गाढवाचा आठवड्याचा 'बटवडा' जास्त मिळतो. याचप्रमाणे लग्नविधी, जातपंचायत, देवधर्म, मर्तिकाविधी याचा देखील उल्लेख आढळून येतो.

**माने लक्ष्मण (१९९७):**

यांनी 'विमुक्तायन' मध्ये महाराष्ट्रातील समग्र भटक्या विमुक्त जमातीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. वडार समाजाच्या संदर्भात माने यांना वडार जमातीच्या कुलनामाची माहिती, वडारांमधील पोटप्रकार गाडीवडार, मातीवडार, जातीवडार यांचा समावेश करण्यात आला आहे. वडार समाजाचा सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक बाबींचा उल्लेख केलेला आढळतो. यामध्ये प्रामुख्याने वडार जमातीच्या लोकांचे राहणीमान, त्यांच्या पोशाखासंबंधी; त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप, दगड फोडणे, माती वाहणे, मूर्ती बनविणे, पाटे-वरवंटे घडविणे इ. कामांचा उल्लेख आढळतो. वडार जमातीची बोलली जाणारी भाषा ही वडारी म्हणून ओळखली जाते, असा उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणे वडारांच्या उगमांबद्दल प्रचलित असणाऱ्या दंतकथा सांगितल्या आहेत.

माने यांनी वडारांच्या धार्मिक जीवनाबद्दल देखील नोंद केलेली आहे. त्यांच्या विवेचनानुसार महाराष्ट्रातील व कर्नाटकामधील वडारांचे धार्मिक जीवन सारखेच आहे. वडार जमातीमध्ये प्रचलित असणाऱ्या लग्नविधीचा देखील उल्लेख प्रस्तुत पुस्तकामध्ये आढळतो.

यामध्ये एकाच आडनावामध्ये वडार जमातीत लग्ने केली जात नाहीत, असे म्हटले आहे. याप्रकारे वडार जमातीचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

**नलावडे रामचंद्र : (२000)**

यांनी आपल्या 'दगडफोड्या' या आत्मचरित्रपर लिखाणामध्ये वडार समाजामध्ये एक वडाराचं पोरं म्हणून जन्माला आल्यानंतर आलेले अनुभव सांगण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाने म्हटले आहे की, प्रथम मी जेव्हा शाळेत जाऊ लागलो त्यावेळी वडाराचं पोरं म्हणून वर्गातील मुलं चेष्टा-कुचेष्टा करीत असत. त्या हालआपेष्टातून आई-वडिलांच्या बरोबर गावोगावं भटकत लेखकाने आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले असे म्हटले आहे. वडार समाजाला व्यवसायासाठी किंवा रोजगारासाठी लागणारी भटकंती, कामाच्या ठिकाणचा मुकादमाचा त्रास इ. गोष्टींचा उल्लेख आढळतो. वडार समाजामध्ये प्रचलित असणाऱ्या धार्मिक रूढी-परंपरा, जातपंचायत, लग्नविधी, अंधश्रद्धा, गावामध्ये असणारे स्थान या सर्व बाबींचा लेखकाने स्वत:ला आलेले अनुभव सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**गायकवाड लक्ष्मण (२000):**

यांनी आपल्या 'वडार वेदना' या आत्मचरित्रपर लिखाणामध्ये तुकाराम नावाच्या पात्राभोवती संपूर्ण वडार समाजाचं जीवन उभं करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वडाराचं जीवन कसे कष्टप्रद आहे, त्यांना कामाच्या ठिकाणी कशी वागणूक मिळते, कशाप्रकारे पिळवणूक केली जाते. तसेच वडार लोक अडाणी असल्यामुळे मुकादमांकडून वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या लोकांकडून कशाप्रकारे व्यावसायिक बाबतीत पिळवणूक होते, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. कामासाठी वेगवेगळ्या ठिकाणी भटकंती करावी लागते. वडार लोकांना कष्टाची कामे करावी लागत असल्यामुळे शारिरीक ताण कमी करण्यासाठी दारू सारख्या मादक पदार्थाचा वापर केला जातो, या गोष्टींवर देखील प्रकाश टाकलेला आहे. महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या सवलतीविषयी इतर राज्याच्या तुलनेमध्ये कशी तफावत आहे. याचा उल्लेख काहीशा प्रमाणात आढळतो. त्याचबरोबर वडार समाजामधील सामाजिक-आर्थिक आणि राजकीय स्थिती

याविषयी वेगवेगळ्या घटनेमधून वास्तवता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## राठोड मोतीराज (२000):

यांनी The Denofigied and Nomadic Tribe Rights action group Newsletter" या नावाने इंटरनेटवर लेख दिला आहे. यामध्ये त्यांनी महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांची संख्या ५ लाख आणि भारतात ६0 लाख आहे, असे सांगितले आहे. यापैकी ३१३ भटक्या जमाती आणि १९८ विमुक्त जमाती आहेत. यापैकी काही जमातीची Criminal Tribe Act-1971 नुसार पिळवणूक केली जाते असे सांगितले आहे. भटक्या विमुक्तांची भारतातील राज्यामधील एकूण वर्गवारी कशाप्रकारे वेगवेगळी आहे हे एका तक्त्याच्या आधारे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये वडार जमात ही महाराष्ट्र आणि तामिळनाडू मध्ये DNT, राजस्थान, हिमाचल प्रदेश, ओरिसा, दिल्ली, कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यात SC आणि बंगाल, बिहार, गुजरातमध्ये ST तर उत्तरप्रदेशामध्ये OBC मध्ये मोडत असल्याचा उल्लेख आढळतो.

## घाटगे बी.एस. (२00१):

यांनी "A Study of the Impact of Social Welfare Measures on the Development of the Nomadic Tribes in Kolhapur District" या विषयावरती पीएच.डी. चा प्रबंध सादर केलेला आहे. वरील विषयाच्या अभ्यासाकरिता त्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात २५0 भटक्या कुटुंबाचा अभ्यास केलेला आहे. त्यानंतर दुसऱ्यांदा त्यांनी पुरातत्व वस्तू, कला, दस्तऐवजाचा साधन म्हणून तथ्य संकलनासाठी आधार घेतला आहे.

केलेल्या पाहणीमध्ये वैयक्तिक माहिती, व्यवसाय, आर्थिक स्थिती, कुटुंब व आरोग्य, सांस्कृतिक रितीरिवाज, गुन्हा व शिक्षा आणि समाज कल्याणाच्या विविध योजनांची माहिती घेण्यात आली आहे. अशाप्रकारे भटक्यांच्या प्रश्नांचा वेध प्रबंधामध्ये घेण्यात आलेला दिसून येतो. तसेच या प्रबंधामध्ये लेखकाने ठळकपणे महाराष्ट्रात आढळणाऱ्या विविध भटक्या जमातींचा संकल्पनात्मक सामाजिक धोरण, समाज कल्याण व समाजकार्य यांचा त्यांच्या

जीवनावर झालेला परिणाम मांडलेला आहे.

प्रस्तुत प्रबंधामध्ये लेखकाने सर्व भटक्या जमातीमधून लोक भिक्षा मागतात असे चित्र रेखाटले आहे. परंतु वडार जमात ही इतरांपेक्षा वेगळी दिसून येते, ती भिक्षा न मागता शारिरीक कष्टाची, अंगमेहनतीची कामे करताना दिसतात. वडार लोक कामाच्या शोधात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकताना दिसतात. दगड काम, माती काम, वाळू वाहणे इ. कामे गाढवांकडून करून घेतात. तसेच घर बांधणी, गवंडी काम, दगड फोडणे, दगडाला आकार देणे इ. कामे करताना आढळतात. सध्यस्थितीमध्ये बहुतेक वडार समाज शहराजवळ राहताना आढळतो, असे प्रतिपादन केले आहे. लेखकाने प्रबंधाच्या शेवटी सांगितले आहे की कोल्हापूर जिल्ह्यातील वडार समाज हा सामाजिक-आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्य इतर जिल्ह्यापेक्षा प्रगत असल्याचा उल्लेख आढळतो.

**चव्हाण रामनाथ (२००२):**

यांनी आपल्या 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत' या पुस्तकामध्ये भटक्या विमुक्तांच्या जात पंचायतीचे पूर्वीच्या काळी समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या जातीवर आधारित पद्धती, रूढी-परंपरा यांचे चित्रण केलेले दिसते. वडार समाजामधील व्यवसायविषयक, भाषेचे, समाजामधील स्त्रिया अंगात चोळी घालत नाही, त्यामागील पुराणकथा सांगितलेल्या आहेत. बदलत्या काळाच्या प्रभावामुळे पूर्वीची जातपंचायतीची तीव्रता काही अंशाने कमी दिसून येते हे सांगितले आहे. तसेच या पुस्तकामध्ये भटक्या विमुक्तांच्या जात-पंचायतीचे, न्यायनिवाड्याचे जातपंचायती बंद करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांचे, जातपंचायत असाव्यात का नसाव्यात याविषयो असणारे वेगवेगळे दृष्टीकोण इ. गोष्टीचे वर्णन प्रामुख्याने आढळते.

**चव्हाण रामनाथ (२००३):**

यांनी आपल्या 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग' या पुस्तकामध्ये वडार जमातीमधील मातीवडार आणि गाडीवडार या दोन पोटजातींविषयी सविस्तर माहिती दिलेली दिसून येते.

यामध्ये त्यांनी वडार समाज म्हणजे शारिरीक कष्टकऱ्यांचा उत्कृष्ट नमुना आहे. आणि या जमातीचे लोक मातीकाम, दगडीकाम, चारी, धरणे, रस्ते किंवा खाणी या ठिकाणी हमखास वडार समाज आढळणारच. अशी कामे इतर व्यक्ती कोणी करू शकणार नाहीत, असे अनेक ठेकेदार आणि कंत्राटदार बोलून दाखवतात. यापुढे चव्हाण यांनी असे प्रतिपादन केले आहे की, वडार समाज हा मूळचा आंध्रप्रदेशातला आहे. कारण वडारांची भाषा ही तेलगू लोकांशी मिळती-जुळती आहे. वडार समाजातील स्त्रिया पुरूषांप्रमाणे कष्टाची कामे करतात. पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून या समाजातील स्त्रिया अहोरात्र कष्ट करतात. पोटासाठी दाही दिशा भटकावं लागतं, त्यामुळे त्यांच्या वाट्याला अस्थिर जीवन आलेले आहे. या जीवनामुळे शिक्षण नाही, शिक्षणाशिवाय कसलेही परिवर्तन नाही, अशी या समाजाची अवस्था दिसून येते. सध्याच्या परिस्थितीचा विचार करता या जमातीमधील बोटांवर मोजण्या इतपत लोकांची स्थिती बऱ्या अवस्थेमध्ये आहे, असे उल्लेखलेले आढळते.

आंध्रप्रदेशातून महाराष्ट्रात आलेला वडारी समाज वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. वडारी, वडूर, वडीयार, वड्डूर अशी नावे आढळून येतात. तसेच व्यवसायावरून त्यांच्यात पोटजाती पाहावयास मिळतात गाढव पाळणारे आणि मातीकाम करणारे 'माती वडार' तर दगडी जाते-पाटे-वरवंटे बनविणारे पाथरवट. त्याशिवाय दगडीवडार, गाडीवडार, खाणवडार असेही काही भेद या समाजात आहेत असे प्रतिपादन केलेले आहे. वडारांमध्ये एकाच आडनावाच्या कुटुंबामध्ये लग्नविधी होत नाहीत आणि वडार जमातीच्या लोकांमध्ये हुंडापद्धती नाही असा उल्लेख आढळतो. परंतु मुलाच्या वडिलांना मुलीच्या वडिलांनी एक हजार एक्कावन्न रूपये लग्नखर्चासाठी देण्याची पूर्वीपासून पद्धत रूढ आहे. वडारांमध्ये जातपंचायतीला खूप महत्त्व असल्याचे आढळते. आजही काही प्रमाणामध्ये जातपंचायतीचे नियम पाळताना लोक दिसतात असे म्हटले आहे. वडार समाज हा अनेक वर्षापासून महाराष्ट्रात राहत असल्याने महाराष्ट्राच्या कोण-कोणत्या बाबींचा प्रभाव वडार जमातीवर पडला आहे, याचे विवेचन केलेले आहे. उदा.धार्मिक बाबी, लोकांच्यामध्ये दारूचे वाढते व्यसन कष्टाची


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कामे करावी लागत असल्याने शारिरीक थकवा घालविण्यासाठी दारूचा उपयोग केला जातो. तसेच शहरात स्थिरावलेले लोक आपल्या पारंपरिक व्यवसायाबरोबरच इतर व्यवसाय करीत आहेत. नवी तरूण पिढी शिक्षणाकडे आकर्षित होत आहे. नवनवीन व्यवसाय करण्याकडे त्यांचा ओढा आहे. बदलत्या काळानुसार परिवर्तनाच्या जाणिवा प्रामुख्याने नव्या पिढीत आढळतात. मात्र शारिरीक कष्टापासून अजूनही हा समाज मुक्त नाही, असे लेखकाने म्हटले आहे.

**घाटगे बी.एस. (२००६):**

यांनी आपल्या "Nomadic Tribe and Social Work in India" या संशोधनावर आधारित पुस्तकामध्ये भारतातील भटक्या जमाती व त्यांचे समाजजीवन यावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. लेखकाने व्यष्टी अध्ययन पद्धतीने महाराष्ट्र राज्यातील भटक्या जमातीचा अभ्यास केलेला दिसून येतो. संपूर्ण भारतभर फिरणाऱ्या जमाती उदा.गोपाळ, कंजारभाट, वडार इ. यांचा उल्लेख आढळतो. लेखकाने पुढे भटक्या जमातीच्या वेगवेगळ्या पद्धतीच्या सामाजिक-आर्थिक बाबी मांडलेल्या दिसून येतात. तसेच त्यांच्या सुधारणेसाठी कोणकोणत्या योजना आहेत याची माहिती दिलेली आहे हे दिसून येते.

पवार सतिश (२००८):

यांनी आपल्या 'वडार समाज आणि संस्कृती' या पुस्तकामध्ये वडार समाजाची आर्थिक-सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक माहिती दिलेली आहे. वडार समाज हा अंधश्रद्धा आणि अशिक्षितपणा यामध्ये गुरफटलेला दिसून येतो, असा उल्लेख केलेला आढळून येतो. पवार यांच्या मते या समाजाने जुन्या प्रथा-परंपरा, चालिरिती सोडून शिक्षणाचा अंगिकार केला पाहिजे.

थोडक्यात वरील सर्व लिखाण पाहता एक गोष्ट लक्षात येते की आजपर्यंतचे लिखाण हे केवळ सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक दृष्टीकोणातून झालेले आपणाला दिसते.

वडारांच्या व्यवसायिक स्थितीविषयी फारशी चर्चा झालेली दिसत नाही. जागतिकीकरणाच्या या युगामध्ये वडार समाजापुढे उदरनिर्वाहाचा जो बिकट प्रश्न निर्माण झाला आहे, त्या प्रश्नांविषयी, उदरनिर्वाहाच्या साधनांविषयी आधुनिकीकरणाचा व्यवसायावर झालेला परिणाम, याविषयी फारसे संशोधन झालेले आढळत नाही. आज या दृष्टीकोनातून वडार समाजाविषयी अभ्यास करण्याची गरज निर्माण झालेली आहे. कारण वडार जमातींमध्ये शिक्षणांचे प्रमाण कमी असल्याने हा समाज अविकसित व असंघटित असल्याचे दिसून येते.

## (II) विभाग दुसरा

## २.२ संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती:

प्रस्तुत विभागामध्ये या अभ्यासासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचे विवेचन करण्यात आले आहे. संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधन क्षेत्र, संशोधन आराखडा, नमुना निवड, तथ्य संकलनासाठी वापरलेले तंत्र, माहितीचे स्त्रोत, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण आणि प्रकरण-नियोजन या संशोधन आराखड्याच्या विविध पैलूंचे विवेचन करण्यात आले आहे.

### २.२.१ संशोधन समस्या (Statement of the Research Problem):

कोल्हापूर शहरातील वडार समाजातील श्रमजीवी कामगारांचा अभ्यास करणे. आणि त्यांची सामाजिक-आर्थिक, व्यावसायिक, शैक्षणिक जीवनशैली समजावून घेणे ही अध्ययनाची संशोधन समस्या आहे. त्यानुसार अभ्यासाचे शीर्षक पुढीलप्रमाणे आहे.

**"कोल्हापूर शहरातील वडार समाजातील श्रमजीवी कामगारांचा अभ्यास"**

**"A Study of manual workers in Vadar community in Kolhapur city"**

### २.२.२ अभ्यासाची उद्दिष्ट्ये : (Specific objectives of the study)

प्रस्तुत अभ्यासासाठी निश्चित करण्यात आलेली उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे

१. कोल्हापूर शहरातील वडार समाजातील कामगारांच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. वडार समाजातील कामगारांच्या कामाच्या परिस्थितीचा अभ्यास करणे.

३. कामगारांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

### २.२.३ संशोधन आराखडा (Research Design):

प्रस्तुत अभ्यासासाठी अन्वेषणात्मक / परिचयात्मक (Exploratory) संशोधन आराखड्याचा अवलंब केला आहे.

### २.२.४ अभ्यास क्षेत्र (The Study Area):

प्रस्तुत अभ्यासासाठी कोल्हापूर शहरातील पाथरवट वसाहत, दौलतनगर, जागृतीनगर व शाहूनगर या वस्तीस्थानांची निवड केलेली आहे. ही चारी वस्तीस्थाने कोल्हापूर शहराच्या पूर्वेला आहेत. या वस्तीस्थानांची निवड सोयीस्कर किंवा सुविधा जनक नमुना निवड पद्धतीने (Accidental convenience sampling) निवड केली आहे

### २.२.५ माहितीचे स्त्रोत:

प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यासाठी पुढील दोन स्त्रोतांचा अवलंब केला आहे.

**१.प्राथमिक माहिती :** वडार समाजातील श्रमजीवी कामगारांच्या मुलाखती घेऊन्म मिळवली.

**२.दुय्यम माहिती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांपैकी वडार समाजातील व्यक्तींनी लिहिलेली आत्मचरित्रे, सामाजिक, सांस्कृतिक वर्णनपर पुस्तके, मासिके, अप्रकाशित एम.फिल., पीएच.डी. प्रबंध, इंटरनेटवरील लेख इ. द्वारे मिळविली.

### २.२.६ नमुना निवड (Sampling):

**अ.वस्तीस्थानांची निवड :**

कोल्हापूर शहरामध्ये वडार समाजाच्या जवळपास १० वस्त्या आहेत. यामध्ये गंजीमाळ, बागल चौक, संभाजीनगर, शनीवार पेठ (महानगरपालिकेच्या पाठीमागे), वारी वसाहत, पाचगाव, पाथरवट वसाहत (सायबर जवळ), दौलतनगर, शाहूनगर व जागृतीनगर

(कोल्हापूर शहर वडार समाजातील पवार जनार्दन माजी उपमहापौर)

यापैकी प्रस्तुत अभ्यासासाठी कोल्हापूर शहरातील पाथरवट वसाहत, दौलतनगर, जागृतीनगर व शाहूनगर या चार वस्तीस्थानांची निवड करण्यात आली आहे. ही वस्तीस्थान निवडण्याचे कारण असे की, वडार जमात ही वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली असल्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणातून माहिती घेणे आवश्यक होते. तसेच वडार समाजामधील लोक कामानिमित्त किंवा व्यवसायानिमित्त बाहेर जातात. तसेच या चार वस्तीस्थानांचा भौगोलिकदृष्ट्या विचार केला तर कोल्हापूर शहराच्या पूर्वेस ही चार वस्तीस्थाने असल्याचे दिसून येतात.

## ब. वस्तीस्थानांमधील उत्तरदात्यांची निवड :

कोल्हापूर शहरामध्ये वडार समाजाची लोकसंख्या ९००० असून १५०० कुटुंबे आहेत. संशोधकाजवळ असणारा वेळ, श्रम आणि पैसा या बाबी ध्यानात घेऊन पाथरवट वसाहत, दौलतनगर, शाहूनगर व जागृतीनगर या चार वस्तीस्थानांमधील उत्तरदात्यांची निवड करण्यासाठी गैर संभाव्यता नमुना निवडीतील सोयीस्कर नमुना निवड (Accidental convenience sampling) या नमुना निवड तंत्राचा वापर करून या चार वस्तीस्थानांमधील प्रत्येकी २५ कुटुंबे याप्रमाणे एकंदर १०० कुटुंबे निवडण्यात आली. निवडण्यात आलेल्या प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याची प्रस्तुत अभ्यासासाठी उत्तरदाता म्हणून निवड केली आहे.

## २.२.७ तथ्य संकलनाची तंत्रे (Tools for collection of Data) :

प्रस्तुत अभ्यासासाठी तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची (Interview Shedule) या तंत्राचा वापर केला आहे. अभ्यासाची उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेवून एक मुलाखत अनुसूची तयार केली. सदर अनुसूचीची पूर्व चाचणी (Pre-test) घेण्यात आली. आवश्यक तेथे प्रश्नांमध्ये दुरूस्त्या करण्यात आल्या, काही प्रश्न वगळले तर काही नवे प्रश्न समाविष्ट करण्यात आले. सुधारित मुलाखत अनुसूचीद्वारे वडार समाजातील लोकांच्याकडून माहिती मिळविली आहे. नमुन्यात समाविष्ट असणाऱ्या कुटुंबातील कुटुंबप्रमुखांच्या मुलाखती घेतल्या



... KOLHAPUR

आहेत. याशिवाय वैयक्तिक निरीक्षण तंत्र, वडार समाजामधील सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी केलेली अनौपचारिक चर्चा तसेच छायाचित्रे यांचाही वापर प्रस्तुत अभ्यासासाठी केला आहे.

### २.२.८ तथ्य संकलन (Data collection):

संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील सर्व उत्तरदात्यांची सदर मुलाखत, मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संशोधिकाने स्वत: मुलाखती घेऊन माहिती संकलित केलेली आहे. तथ्य संकलनाचे काम १२ डिसेंबर ते २१ जानेवारी २००९ च्या दरम्यान केले आहे.

### २.२.९ माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण (Analysis and Interpretation of Data):

प्रस्तुत अभ्यासासाठी मुलाखत अनुसूचीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी संगणकाचा वापर करून या माहितीवर प्रक्रिया करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार एक संकेत पुस्तिका (Code Book) तयार करण्यात आली. संकेत पुस्तिकेच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे सांकेतीकरण केले. सदरची माहिती समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील UGC-SAP-DRS phase I संगणक प्रयोगशाळेतील SPSS या Soft ware च्या सहाय्याने मिळालेल्या माहितीवर प्रक्रिया करण्यात आली. संगणकाच्या सहाय्याने प्रक्रिया केलेल्या माहितीच्या आधारे सारण्या तयार करण्यात आल्या, त्यातील सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करून अभ्यासाचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. अभ्यासविषय, अभ्यासाची उद्दिष्ट्ये, मिळवलेली प्राथमिक आणि दुय्यम माहिती यांचे योग्य संघटन आणि सादरीकरण करण्यासाठी विविध प्रकरणांचे नियोजन करण्यात आले आहे.

### २.२.१० प्रकरणांची रूपरेषा (Chapter Scheme):

प्रस्तुत संशोधन लघुशोधप्रबंधाची विभागणी पुढीलप्रमाणे सहा प्रकरणात केली आहे.

१. वडार समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२. कोल्हापूर शहरातील वडार समाजातील श्रमजीवी कामगारांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी

३.	कोल्हापूर शहरातील वडार समाजातील कामगारांच्या कामाची परिस्थिती व समस्या

४.	निष्कर्ष आणि सूचना

यापुढील प्रकरणामध्ये वडार समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी याविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

## संदर्भ सूची :


१. आत्रे त्रि.ना. (१९१५)-"गावगाडा", वरदा प्रकाशन, पुणे.

२. कांबळे उत्तम (१९८८)-"भटक्यांचे लग्न", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३. खरात शंकरराव (१९८३)- "आज इथं उदया तिथं" आनंद प्रकाशन, औरंगाबाद.

४. गर्गे स.मा. (१९८९)-"भारतीय समाजविज्ञान कोशखंड-३" कल्पना मुद्रणालय, पुणे.

५. गायकवाड लक्ष्मण (२000)-" वडारवेदना", परचुरे प्रकाशन मंदीर, गिरागाव.

६. चव्हाण रामनाथ (१९८९)- "जाती आणि जमाती", मेहता पब्लिशिंग, हाऊस पुणे.

७. चव्हाण रामनाथ (२00२)-"भटक्या विमुक्तांची जातपंचायत", देशमुख आणि कंपनी, पुणे.

८. चव्हाण रामनाथ (२00३)- "भटक्या विमुक्तांचे अंतरंग", स्नेहवर्धन पब्लिकेशन, पुणे

९. नलावडे रामचंद्र (२000)-"दगडफोड्या" देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे.

१0. पवार सतीश (२00८)-"वडार आणि संस्कृती", ओड्र सेवा संस्था प्रकाशन, कोल्हापूर.

११. पिंगळे भिमराव (१९९0)-"वनवासी व उपेक्षित जग", अभिनव जीवन प्रकाशन, बीड.

१२. माने लक्ष्मण (१९९७)-"विमुक्तायन-महाराष्ट्रातील विमुक्त जमाती एक चिकित्सक अभ्यास" यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.

१३. मांडे प्रभाकर (१९८३)-"गावगाड्याबाहेर" परिमल प्रकाशन, औरंगाबाद.


## Reference :


1. Bhat Chandrashekhar (1984)-"Ethnicity and Mobility-Emerging Ethnic Identity and Social Mobility among the Waddars of South India" Naurang Rai.

2. Ghatage B.S. (2001) "A study of the Impact of Social Welfare Measures on the Development of the Nomadic Tribes in Kolhapur District (Unpublished Ph.D. Thesis Shivaji University, Kolhapur.)

3. Ghatage B.S. (2006) 'Nomadic tribe and Social Work in India', Sheuti Prakashan.

4. Rathod Motiraj (2000) 'The Denotified and Nomadic tribe rights action group Newsletter".

http://sickle.bwh-harvard.edu/india-tribes-html



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.